Copy 33

अखिल भारतीय सेवा व राज्य सेवेमधील अधिका-यांना मुंबई नागरी सेवा नियम ६०९ खाली मिळणारे विशेष वेतन/अतिरिक्त वेतन व त्यासंबंधीची स्पष्टीकरणे —

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक पीएवाय १२७९/सीआर ६०४/एसईआर-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जुलै १९८०.

पहावे:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १६५९/एस २, दिनांक २९ जानेवारी १९६०.

(२) शासन निर्णय, राजकीय व सेवा विभाग, क्रमांक एमआयएस १०६०/सी, दिनांक ३१ मार्च १९६०.

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १०६३/३००९/पाच, दिनांक ३ फेब्रुवारी १९६५.

(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १२७३/७१०/एस-१, दिनांक २ एप्रिल १९७३.

(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १२७५/२५३८/एस-१, दिनांक १ ऑगस्ट १९७५.

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एआएस ३०७६/दहा, दिनांक १ जानेवारी १९७७.

OFFICE OF THE COLLECTOR
Date 15.7.1980
Branch

(७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७६/एचआर-२४४-दहा, दिनांक ८ फेब्रुवारी, १९७७.

(८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एआयएस ३०७८/दहा, दिनांक १२ जानेवारी १९७८.

(९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १२७७/सीआर ९९३/एसईआर-३, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८.

4861 | 77

**शासन निर्णय:-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एआयएस ३०७८/दहा, दिनांक १२ जानेवारी १९७८ यानुसार प्रवर्धित केलेल्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एआयएस ३०७६/दहा, दिनांक १ जानेवारी १९७७ नुसार अखिल भारतीय सेवेतील अधिकारी व त्याचप्रमाणे राज्य सेवेतील जिल्हाधिकारी/जिल्हा पोलीस अधीक्षक व या दर्जाच्या वरचे अधिकारी यांना समान दर्जाच्या जागेचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल मिळणा-या अतिरिक्त वेतनाचे विनियमन केले जाते. या आदेशांनुसार अखिल भारतीय सेवेतील अतीत समयश्रेणीतील अधिका-यांना दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळण्यासाठी अतिरिक्त वेतन मिळत नाही. परंतु जिल्हाधिकारी/जिल्हा पोलीस अधिकारी व त्यावरच्या दर्जाच्या अधिका-यांना मिळणारे अतिरिक्त वेतन वर निर्देश केलेल्या

(१९)

सामान्य प्रशासन विभागाच्या, शासन निर्णय दिनांक १ जानेवारी १९७७ यामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे दिले जाते.

२. शासनाने आपल्या अधिका-यांना दुस-या पदाचा जादा कार्यभार धारण करण्याबद्दल दिल्या जाणा-या अतिरिक्त वेतनाबद्दलचा पुनर्विचार केला असून असे ठरविले आहे की, अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र राज्याच्या सेवेत असणारे अधिकारी धरून कोणत्याही प्रकारच्या सेवेत असणा-या शासनाच्या सर्व अधिका-यांना जादा कार्यभार धारण करण्याकरिता दिले जाणारे अतिरिक्त/विशेष वेतन दिले जावे. याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १ जानेवारी १९७७ व १२ जानेवारी १९७८ हे निर्णय निष्प्रभावित करून शासन असे आदेश देत आहे की, राज्य सेवेतील, तसेच अखिल भारतीय सेवेतील शासनाच्या सर्व अधिका-यांना याप्रमाणे मिळणारे विशेष वेतन दिले जावे व हे विशेष वेतन मुंबई नागरी सेवा नियम ६०९ व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १२७७/सीआर-९९३/एसईआर-३, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ नुसार नियमित केले जावे, मात्र राज्य सेवेतील व अखिल भारतीय सेवेतील जे अधिकारी ज्या वेतनश्रेणीचे अगर विस्तारित वेतनश्रेणीचे किमान वेतन रुपये २००० व त्यापेक्षा जास्त आहे अशा वेतनश्रेणीत वेतन घेत असल्यास, अशी समय-श्रेणी संवर्ग पदाची असो अगर संवर्गात नसलेल्या पदाची असो, त्यांना असे विशेष वेतन दिले जाऊ नये.

३. न्यायालयीन विभागातील अधिका-यांच्या बाबतीत २००० — २२५० रुपये ह्या निवड श्रेणी-तील पदे धारण करणा-या अधिका-यांनासुध्दा दुस-या तुलनीय/वरच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल मिळणारे विशेष वेतन देय असेल. मात्र २००० — २२५० रुपये ह्यापेक्षा जास्त वेतन-श्रेणीतील अधिका-यांना तुलनीय अगर वरच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्याबद्दल असे विशेष वेतन देय असणार नाही.

४. शासन पुढे असेही आदेश देत आहे की, दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण केल्या-बद्दलचे विशेष वेतन हे अतिरिक्त कार्यभार धारण केल्याचा काळ १५ दिवसापेक्षा जास्त असल्या-शिवाय देण्यात येऊ नये. याप्रमाणे शासन असा आदेश देत आहे की मुंबई नागरी सेवा नियम ६०९ च्या खंड (बी) मध्ये "१५ दिवसापेक्षा कमी" ह्या शब्दांऐवजी "१६ दिवसापेक्षा कमी" हे शब्द व अक्षरे घालावीत.

५. शासन पुढे असाही आदेश देत आहे की मुंबई नागरी सेवा नियम ६०९ खाली देय असलेले विशेष वेतन दरमहा रुपये २५०/- पर्यन्त मर्यादित असावे. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय १२७७/सीआर ९९३/एसआर-३, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ यातील परिच्छेद ३ हा याप्रमाणे दुरुस्त केला गेला असे समजावे.

६. मुंबई नागरी सेवा नियम ६०९ या खालील प्रशासकीय विभाग/विभागीय प्रमुख यांना प्रदान केलेल्या शक्तींच्या प्रत्यायोजना बद्दलचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय १२७७/सीआर ९९३/एसईआर-३, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ या अन्वये दिले गेले आहेत. याबाबतीत त्यानंतर काही मुद्दे उपस्थित केले गेले आहेत. ह्या निर्णयासोबत जोडलेल्या जोडपत्रात ह्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

७. ह्या सोबत जोडलेल्या स्पष्टीकरणांसहित हे आदेश दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ पासून अंमलात येतील. सोबत जोडलेल्या जोडपत्रातील क्रमांक (३) च्या स्पष्टीकरणाच्या कक्षेत येणारी

प्रकरणे सोडून यापूर्वीच निर्णय झालेली प्रकरणे परत सुरु करण्यात येऊ नयेत.

८. त्याचप्रमाणे, ज्या प्रकरणांचा प्रशासकीय विभागांनी त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून निर्णय घेतलेला आहे अशी प्रकरणे — जरी त्यांना प्रदान केलेल्या शक्तींच्या कक्षेत येत नसली तरी — परत सुरु करण्यात येऊ नयेत.

९. मुंबई नागरी सेवा नियम ६०९ मध्ये जरूर त्या सुधारणा यथावकाश करण्यात याव्यात.

१०. सोबत ह्या आदेशांची इंग्रजी प्रत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्रीमती सरला पंडित,
शासनाच्या उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*वरिष्ठ उप संचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतूक लेखा परीक्षा मंडळ, मुंबई,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
निवासी लेखा अधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-३, वित्त विभाग,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*केंद्र शासनाचे वित्त मंत्रालयाचे सचिव, नवी दिल्ली.

*पत्राद्वारे.

दिनांक

क्रमांक

(21)

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय-१२७९/६०४/एसईआर-३, दिनांक १९ जुलै १९८० चे जोडपत्र

## जो ड प त्र

| उपस्थित झालेले मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|
| (१) जर जादा कार्यभार धारण केलेला काळ शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ चे आदेश निर्गमित होण्यापूर्वीचा असेल तर ज्याला ह्या बाबतीत ह्या शक्तीचे प्रत्यायोजन केलेले आहे असे म्हणजेच प्रशासकीय विभाग/विभागप्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख हे आदेश काढू शकतील काय? | होय. तथापि अतिरिक्त वेतन/विशेष वेतनाची रक्कम ज्या ज्या वेळेस दुहेरी कार्यभार/संयुक्त पदावर नियुक्ती झाली असेल त्या त्या वेळेस अस्तित्वात असलेल्या नियमांप्रमाणे अगर कार्यकारी आदेशांप्रमाणे नियमित करावी. |
| (२) जर जादा कार्यभार धारण केलेला काळ शासन निर्णय, वित्त विभाग, , दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ चे आदेश निर्गमित होण्यापूर्वीचा असेल तर अशा ठिकाणी प्रशासकीय विभाग/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख हे २० टक्के इतके अतिरिक्त वेतन/विशेष वेतन मंजूर करु शकतील काय? | नाही. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ यातील आदेश ह्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येत असल्यामुळे, या प्रकरणी १६ नोव्हेंबर १९७८ पूर्वीचे अतिरिक्त वेतन/विशेष वेतन ज्या ज्या वेळेस दुहेरी कार्यभार संयुक्त पदावर नियुक्ती झाली असेल त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार/कार्यकारी आदेशांप्रमाणे नियमित करावे. |
| (३) ज्या प्रकरणामध्ये जादा कार्यभार धारण केल्याचा काळ शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ चे आदेश निर्गमित झाल्यानंतरचा असेल तरी पण विशेष वेतन मात्र १६ नोव्हेंबर १९७८ पूर्वी अस्तित्वात असलेले नियम/कार्यकारी आदेशानुसार १० टक्के एवढेच दिले गेले असेल अशी प्रकरणे मुंबई नागरी सेवा नियम ६०९ खाली ज्या प्राधिकाऱ्यांना विशेष वेतन मंजूर करण्याच्या शक्ती प्रदान केल्या गेल्या आहेत असे प्राधिकारी ही प्रकरणे पुनः सुरु करु शकतील काय? | होय. |
| (४) ज्या प्रकरणी जादा कार्यभार धारण केल्याचा काही भाग १६ नोव्हेंबर १९७८ पूर्वी व काही भाग १६ नोव्हेंबर १९७८ नंतर पडत असेल आणि हा सर्व काळ सलग असेल अशा ठिकाणी | वर म्हटल्याप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ ह्यामधील आदेश त्या आदेशांच्या दिनांकापासून लागू असल्यामुळे, विशेष वेतन |

अतिरिक्त वेतन/विशेष वेतन १० टक्के अगर २० टक्के कोणत्या दराने द्यावे?

सरसकट २० टक्के दराने त्या दिनांका-पासून लागू होते. त्यामुळे जो काळ १६ नोव्हेंबर १९७८ पूर्वी पडतो त्या काळाकरिता विशेष वेतन/अतिरिक्त वेतन त्या दिनांकापूर्वी लागू असलेल्या नियमांप्रमाणे देय असेल व १६ नोव्हेंबर १९७८ पासूनच्या उर्वरित भागाकरिता असे जादा/विशेष वेतन २० टक्के दराने देय असेल.

(५) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ खाली प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख या पदांच्या खालील दर्जाचे नियुक्ती प्राधिकारी ते ज्या लोकांची नियुक्ती करण्यास सक्षम आहेत अशा लोकांना विशेष वेतन मंजूर करु शकतील काय?

नाही.

(६) जे विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख वर्ग दोन मधील अधिका-यांची वर्ग एक मधल्या पदाचा जादा कार्यभार धारण करण्यास नेमणूक करण्यास सक्षम आहेत ते विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख त्यांना प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन असे विशेष वेतन मंजूर करु शकतील काय?

शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ च्या परिच्छेद २(बी) प्रमाणे विभाग प्रमुख आपल्या नियंत्रणाखालील वर्ग दोनच्या अधिका-यांना अतिरिक्त/विशेष वेतन मंजूर करण्यास सक्षम आहेत. त्यामुळे ज्या वर्ग दोनच्या अधिका-यांची वर्ग एकच्या पदाचा जादा कार्यभार देण्याबाबत नेमणूक होईल अगर स्वतःचे पद सांभाळून ज्यांची वर्ग एकच्या पदावर नेमणूक होईल अशा अधिका-यांना अतिरिक्त विशेष वेतन मंजूर करण्यास हरकत नाही.

(७) शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ च्या परिच्छेद २(सी) प्रमाणे ज्या अराजपत्रित अधिका-यांची वर्ग दोनच्या पदाचा जादा कार्यभार धारण करण्यास नेमणूक होईल अशांना शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेवर अतिरिक्त/विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. आता असा मुद्दा उपस्थित केला गेला आहे की ज्या ठिकाणी असा दुहेरी कार्यभार/संयोगित नियुक्ती ही केवळ स्थानिक व कामचलाऊ व्यवस्था म्हणून अवलंबित केली गेली

होय. तथापि ज्या ठिकाणी क्रमांक (१) आणि (२) ह्या अटींची पूर्तता होत नसेल अशा ठिकाणी दुहेरी कार्यभारासाठी अगर संयोगित पदावरील नेमणुकीसाठी देण्यात येणारे जादा वेतन मंजूर करण्यास प्रशासकीय विभाग हाच सक्षम प्राधिकारी समजावा. अशा प्रकरणी संबंधित प्रशासकीय विभागाने निवड सूचीप्रमाणे नेमणूक करणे बरोबरीच शक्य नाही/नव्हते, ह्याची तसेच ज्या अराजपत्रित अधिका-यांची वर्ग दोनच्या पदाचा जादा कार्यभार सांभाळण्याबाबत नेमणूक होईल तो असे वर्ग दोनचे

(23)

| | |
|---|---|
| असेल आणि म्हणून ज्या ठिकाणी संयुक्त जेष्ठता सुचीची अंमलबजावणी करणे शक्य नसेल अशा ठिकाणी शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १६ नोव्हेंबर १९७८ मधील अटींच्या पूर्ततेची गरज आहे काय? | धारण करण्यास अन्यथा पात्र आणि योग्य आहे ह्याची खातरजमा करुन घ्यावी. |
| (८) जर एखाद्या व्यक्तीस मुंबई नागरी सेवा नियम ९(४९) खाली विशेष वेतन मिळत असेल व ते त्याच्या स्वतःच्या पदास मुंबई नागरी सेवा नियम ९(४९) या खाली संलग्न असेल, तर अशा व्यक्तीची समान/वरच्या पदाच्या जादा कार्यभार पाहण्यास नेमणूक झाल्यास, अशा व्यक्तीस तिच्या स्वतःच्या पदावर मिळणा-या विशेष वेतनाशिवाय मुंबई नागरी सेवा नियम ६०९ खाली मिळणारे अतिरिक्त/विशेष घेण्यास परवानगी आहे काय? | होय. |
| (९) ज्या पदास मुंबई नागरी सेवा नियम ९(४९) ह्याखाली मिळणारे विशेष वेतन संलग्न आहे अशा पदावर एखाद्या अधिका-याची जादा कार्यभार धारण करण्यापुरती नेमणूक झाल्यास तो अधिकारी त्या पदाचे विशेष वेतन घेऊ शकतो काय व शकत असल्यास कोणत्या दराने घेऊ शकतो? | अशी प्रकरणे शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय-१०७९/सीआर ७४१/एसजीआर-३, दिनांक ९ ऑक्टोबर १९७९ नुसार विनियमित करावी. |

No. AB/EST-4861/799
Ratnagiri 2/x/80

Transferred to EST Paranels for disposal

For Collr. Ratnagiri

EST
9 OCT 198
6005
1347